आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शुक्रवार दिनांक ०२ मे २०२५

**ठळक बातम्या**

1. **किनारपट्टीवरची राज्यं आणि बंदरांची शहरं विकसित भारताच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावतील - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन.**

2. **वेव्हज शिखर परिषदेत आज माहिती आणि प्रसारण मंत्रालयातर्फे जागतिक मीडिया संवादाचे आयोजन, सदस्य राष्ट्रांनी केला वेव्हज घोषणापत्राचा स्वीकार.**

3. **निकोप उद्योजकता परिसंस्थांच्या निर्मितीसाठी जीएएमई आणि निती आयोग यांच्यात धोरणात्मक भागीदारी, नागपूर, विशाखापट्टणम आणि उत्तर प्रदेशमधील पथदर्शी स्थळांपासून सुरवात.**

4. **आज भंडारा गोंदिया आणि चंद्रपूर जिल्ह्यात वादळी पर्जन्यमानाचा ऑरेंज अलर्ट जारी.**

**पीएम-गतिशक्ती**

किनारपट्टी वरची राज्यं आणि बंदरांची शहरं विकसित भारताच्या वाटचालीत महत्त्वाची भूमिका बजावतील असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. केरळात तिरुवनंतपुरममध्ये, विळींजम इथं खोल पाण्यातल्या आंतरराष्ट्रीय बहुउपयोगी बंदराचं उद्घाटन आणि लोकार्पण आज मोदी यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. आतापर्यंत भारतातली ७५ टक्के समुद्र मार्गाने होणारी आयात ही परदेशातल्या बंदरांवर होत होती. ही सर्व प्रक्रिया अत्यंत खर्चिक होती. आता मात्र, या विळिंजममुळे हा खर्च वाचणार असून, त्याचा उपयोग केरळ वासियांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी होईल असंही मोदी यावेळी म्हणाले.

*अभी तक भारत का 75% ट्रान्सशिपमेंट भारत के बाहर के पोर्ट पर होता था। इससे देश को बहुत बड़ा रेवेन्यू लॉस होता आया है। ये परिस्थिति अब बदलने जा रही है। अब देश का पैसा देश के काम आएगा। जो पैसा बाहर जाता था वो केरला और विझिंजम के लोगों के लिए नई इकोनॉमिक अपॉर्च्यूनिटी लेकर आएगा।*

या सोहळ्याला केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल, केरळचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर, मुख्यमंत्री पिनराई विजयन यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित विझिंजम होते. इथं आठ हजार ८०० कोटी रुपये खर्चून उभारलेलं हे बंदर देशातलं पहिलं अर्धस्वयंचलित तसंच खोल पाण्यातली कंटेनर वाहतूक करणारं बंदर ठरणार आहे. विळिंजम बंदरामुळे भारत, मध्य आशिया आणि युरोप दरम्यान दळण वळणाचा सोयीचा मार्ग उपलब्ध होणार आहे.

**जीएसटी संकलन**

नुकत्याच संपलेल्या एप्रिल महिन्यात, एकूण जी.एस.टी. संकलन दोन लाख ३६ हजार कोटी इतकं झालं असून, ते गेल्या एप्रिल महिन्याच्या दोन लाख १० हजार कोटी संकलनाच्या तुलनेत, १२ पूर्णांक सहा दशांश टक्क्यांनी अधिक आहे. एप्रिल २०२५ मध्ये निव्वळ जी.एस.टी. संकलन दोन लाख नऊ हजार कोटींपर्यंत पोहोचलं. ही आकडेवारी भारतीय अर्थव्यवस्थेची दृढता आणि सहकारी संघराज्यवादाची कार्यक्षमता स्पष्ट करते असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. जी.एस.टी.मध्ये योगदान देणाऱ्या करदात्यांचं आणि या यंत्रणेत असलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी आभार मानलं.

**पीयूष गोयल**

भारत-युरोपीयन संघ मुक्त व्यापार कराराला, या वर्षं अखेरीपर्यंत मूर्त स्वरुप येईल असा विश्वास, वाणिज्य आणि उद्योग मंत्री, पीयूष गोयल आणि युरोपियन संघाचे व्यापार आणि आर्थिक सुरक्षा आयुक्त, मारोश सेफकोविच यांनी व्यक्त केला आहे. बेल्जियममध्ये ब्रुसेल्स इथं काल झालेल्या एका महत्त्वाच्या बैठकीत दोन्ही बाजूंनी जागतिक व्यापार आव्हानांचा सामना करण्याविषयी चर्चा झाली.

**वेव्हज**

जागतिक ऑडियो-व्हिज्युअल आणि मनोरंजन परिषद अर्थात वेव्हजमध्ये आज जागतिक माध्यम संवाद आयोजिण्यात आला. परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री एम.मुरुगन या संवादात सहभागी झाले होते. "सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी, जागतिक सहकार्य हाच पुढे जाण्याचा मार्ग आहे, तसंच एकमेकांच्या सांस्कृतिक संवेदनशीलता समजून घेणे हाच मार्ग आहे." मुंबईत सुरू असलेल्या जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषदे दरम्यान वेव्हज-२०२५ मुंबईत झालेल्या जागतिक माध्यम संवादाच्या सत्राचा सूर होता. डिजिटल दरी कमी करण्याच्या मार्गावर आपण सर्वजण वाटचाल करत असताना देशांमध्ये सर्जनशील जागा वाढवणे ही आपल्या सामूहिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे असं संवादात सहभागी झालेल्या राष्ट्रांनी म्हटलं. नवोन्मेष आणि सर्जनशीलता हे विकसित भारतासाठी महत्वाचं असल्याचं ते म्हणाले -

*In many ways, technology can strengthen awareness of our vast heritage and deepen consciousness about it, especially for younger generations. We also bear in mind that innovation is key to the leapfrogging that will create a developed India by 2047.*

दरम्यान, वैष्णव यांनी यावेळी बोलताना सर्जनशीलता, संस्कृती आणि सहकार्य हे जागतिक मीडिया सहकार्याचं तीन स्तंभ असल्याचं अधोरेखित केलं. या क्षेत्राचं योगदान केवळ वित्तीय नसून, त्यापलीकडे असल्याचं ते म्हणाले

*Globally, the media and entertainment industry is valued around 3 trillion dollars, but its true value goes far beyond the numbers. The true value lies in the empathy that it creates, in the ideas that it conveys, and in the future that it helps us imagine.*

वाढत्या जागतिकीकरण झालेल्या माध्यम वातावरणात जागतिक शांतता आणि सौहार्द वाढविण्यासाठी सरकारांच्या भूमिकेवर हा संवाद केंद्रित होता ज्याचा शेवट सदस्य राष्ट्रांनी वेव्हज घोषणापत्र स्वीकारण्यात झाला.

## GAME

भारतातील विविध राज्यांमध्ये चैतन्यशील उद्योजकता परिसंस्था निर्माण होण्यास पाठबळ देण्याच्या उद्देशानं 'ग्लोबल अलायन्स फॉर मास एंटरप्रेन्योरशिप' अर्थात GAME आणि निती आयोगानं धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली आहे. या भागीदारीच्या माध्यमातून नागपूर, विशाखापट्टणम आणि उत्तर प्रदेशमधील पथदर्शी स्थळे म्हणून निवडण्यात आलेल्या ठिकाणांपासून सुरुवात करून स्थान आधारित हस्तक्षेपांना चालना देण्यावर मुख्य भर असणार आहे. या भागीदारीद्वारे स्थानिक उद्योजकांना सक्षम बनवण्याचा तसंच त्या विशिष्ट भागातील उद्योजकता परिसंस्थेमध्ये संबंधित स्थानिक भागधारकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जाईल. या भागधारकांमध्ये सरकार, कॉर्पोरेट्स, शैक्षणिक संस्था, वित्तीय संस्था, यशस्वी उद्योजक आणि समुदाय संघटनांचा समावेश आहे. प्रत्येक भागातील विशिष्ट अशा आव्हानांवर स्थानिक पातळीवर उपाय शोधून उद्योजकतेला आर्थिक विकास आणि रोजगार निर्मितीस चालना देणाऱ्या चळवळीचं रुप प्राप्त करून देणे हा, GAME आणि निती आयोगाचा उद्देश आहे.

## प्रतापराव जाधव

अध्यात्मिक वारशासाठी आणि कुंभमेळयाचं स्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या नाशिक शहरात आज ११व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या ५० दिवसांच्या उलटगणने निमित्त योग महोत्सव घेण्यात आला. पंचवटीत रामकुंड परिसरातल्या गौरी मैदान इथं सामूहिक योग प्रात्यक्षिकांनी योग महोत्सवाची सुरुवात झाली. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्यासह अनेक मान्यवर, योग अभ्यासक आणि नागरिक यावेळी उपस्थित होते. ११वा योग दिवस देशात एक लाख ठिकाणी साजरा होईल, यादृष्टीनं नियोजन करण्यात आलं असून, त्यासाठी योग संगम ॲप तयार करण्यात आलं असून, त्यात नोंदणी करून योगसाधना करता येईल अशी माहिती, जाधव यांनी यावेळी दिली.

*२१ जूनला आपल्या संपूर्ण देशामध्ये मोठ्या शहरांमध्ये, गावामध्ये इव्हेन्ट केल्या जातील आणि त्याची नोंद घेण्यासाठी आज योग संगम नावाच्या पोर्टल सुद्धा आपण लॉंच केले आहे. या माध्यमातून त्या दिवशी किती लोकांनी योगा केला, किती लोक योगा करण्यामध्ये सहभागी झाले याची बऱ्यापैकी आकडेवारी आपल्याला समजायला भेटेल.*

योगामधून एकात्मिकता साधली जाते, ही साधना एका दिवसासाठी नसून निरंतर चालणारी चळवळ असल्याचंही त्यांनी नमूद केलं. मुलं आणि महिलांनी कोणती आसनं करावी तसंच आजार निहाय कोणत्या प्रकारचे योगासनं उपयुक्त ठरू शकतात याचे पॅकेजेस लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचं जाधव यांनी सांगितलं.

## शिकावू उमेदवारी

राष्ट्रीय शिकावू उमेदवारी प्रोत्साहन अर्थात अप्रेंटिस योजनेत महाराष्ट्र देशात अव्वल राहिल्याबद्दल केंद्रीय कौशल्य विकास मंत्री, जयंत चौधरी यांनी राज्याचे कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांचं अभिनंदन केलं आहे. चौधरी यांनी काल मंत्रालयात कौशल्य विकास विभागाला भेट दिली.

## आयपीएल टी-ट्वेंटी

आय.पी.एल. टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातला सामना अहमदाबाद इथं होणार आहे. जयपूरमधे काल झालेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सनं राजस्थान रॉयल्सचा १०० धावांनी पराभव केला.

## वीज बिल माफ

शेती आणि शेतकरी शासनासाठी सर्वोच्च प्राधान्याचं क्षेत्र आहे. शेतकऱ्यांना वीज बिलाच्या भारातून मुक्त करण्यासाठी शासनानं नुकतीच 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' सुरु केली. जिल्ह्यात या योजनेतून आतापर्यंत एक लाख २७ हजार शेतकऱ्यांना १९७ कोटींची वीज बिल माफी देण्यात आली आहे असं पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितलं.

## हवामान

विदर्भातील भंडारा, गोंदिया आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये आज सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. याशिवाय नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये देखील, सतर्कतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आला असून, वादळी पर्जन्यमान राहू शकत. बुलढाणा, अकोला, वाशिम या जिल्ह्यांमध्ये मात्र हवामान सामान्य राहील उद्या देखील संपूर्ण विदर्भात वादळी पर्जन्यमान राहणार असून भंडारा, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ या ठिकाणी ऑरेंज तर उर्वरित जिल्ह्यांमध्ये येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान आज अकोला जिल्ह्यात 44.5 अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली तर नागपुरात 41.6 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं.

## कुटुंबीय भेट

नागपूरच्या मध्यवर्ती कारागृह प्रशासनाच्या एका उपक्रमांतर्गत कारागृहातील आरोपी आणि शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांना त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेण्याची विशेष संधी देण्यात आली. कारागृह प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, अनेक कैदी दीर्घ काळापासून त्यांच्या कुटुंबीयांपासून दूर आहेत. त्यामुळे त्यांच्यात नैराश्य, तणाव आणि भावनिक तुटलेपणा जाणवत असतो. हे लक्षात घेता कैद्यांचं मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्यांच्यात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी, प्रशासनानं ही भेट आयोजित केली.

## लोकशाही दिन

महापालिकेच्या मुख्यालयातील डॉ.पंजाबराव देशमुख स्थायी समिती सभागृहात येत्या पाच मे रोजी "लोकशाही दिन" सकाळी दहा वाजता आयोजित केला आहे.

******